आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१९ नोव्हेंबर २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी उद्या होणाऱ्या मतदानाकरता निवडणूक यंत्रणा सज्ज, मतदारांसाठी विविध सोयी सुविधा, मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं मतदारांना आवाहन

- राज्यात २८८ मतदार संघात ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात, ३६३ महिला उमेदवारांचा समावेश

- पैसे वाटप प्रकरणी भाजपा नेते विनोद तावडे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू, आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल, अटक करण्याची काँग्रेसची मागणी

**आणि**

- महिलांच्या आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारत अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी उद्या सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. त्यासाठी अधिकारी-कर्मचारी मतदान केंद्रांवर रवाना झाले आहे. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्रं उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल. सर्वाधिक सुमारे साडे ८ हजार मतदान केंद्र पुणे जिल्ह्यात आहेत. त्यानंतर **मुंबई उपनगर, ठाणे**, या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. सर्वात कमी सव्वा ९ शे मतदान

केंद्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत. **गडचिरोलीत** सुद्धा १ हजार पेक्षा कमी मतदान केंद्र आहेत. मतदारसंघाचा विचार करता सर्वाधिक ५७४ मतदान केंद्र **रायगड** जिल्ह्यात **पनवेल** मतदार संघात आहेत. **खडकवासला, भोसरी, हडपसर, मुरबाड, नालासोपारा** वगैरे मतदार संघात मोठ्या प्रमाणात मतदान केंद्र आहेत. **मुंबईत वडाळा मतदारसंघात** सर्वात कमी म्हणजे २२३ मतदान केंद्र आहेत. **वरळी, माहिम, कुलाबा, मुंबादेवी** या मतदारसंघातही मतदान केंद्रांची संख्या अडीचशे पेक्षा कमी आहे. सर्वाधिक २६ मतदार संघ मुंबई उपनगर जिल्ह्यात असून त्यानंतर **पुणे, छत्रपती संभाजीनगर** यांचा क्रमांक लागतो.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात आहेत. त्यात ३ हजार ७७१ पुरुष, ३६३ महिला आणि २ तृतीयपंथी आहेत.

**बीड** जिल्ह्यात माजलगाव मतदारसंघात सर्वाधिक ३४ उमेदवार रिंगणात आहेत. **पुणे** जिल्ह्यात सर्वाधिक ३०३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. सर्वात कमी १७ उमेदवार **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात आहे. **उत्तर नांदेड** मतदारसंघामध्ये ३३, **जालन्यात भोकरदनमध्ये** ३२, **बीडमध्ये** ३१ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. **नंदूरबार** जिल्ह्यातल्या **शहादा** मतदार संघात सर्वात कमी ३ उमेदवार रिंगणात आहेत. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात **कुडाळमध्ये** आणि **रायगड** जिल्ह्यात महाडमध्ये प्रत्येकी ५ उमेदवारांचं नशीब उद्या मतपेटीत बंद होईल. **नांदेड** लोकसभा पोटनिवडणुकीसाठीही उद्या मतदान होणार आहे आणि त्याठिकाणी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या २८८ मतदार संघांमध्ये १५८ पक्षांकडून २ हजार ५० उमेदवार रिंगणात आहे. उर्वरित २ हजार ८६ अपक्ष आहेत. सर्वाधिक २३७ उमेदवार बहुजन समाज पार्टीनं उभे केले असून वंचित बहुजन आघाडीचे २०० उमेदवार रिंगणात आहेत. भाजपानं १४९, मनसेनं सव्वाशे, काँग्रेसनं १०१ उमेदवारांना निवडणुकीत उतरवलं आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून ९५, शरद पवारांकडून ८६, एकनाथ शिंदेंकडून ८१, अजित पवारांकडून ५९ उमेदवार नशीब आजमावत आहेत. राष्ट्रीय समाज पक्षाकडून ९३, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाकडून ३२, प्रहार जनशक्तीचे ३८, माकपाचे ३, MIM चे १७, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे ४, जनसुराज्य शक्तीचे ६, शेकापचे १८, समाजवादी पार्टीचे ९ आणि भाकपाचे २ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत महिला मतदारांचं प्रमाण लक्षणीय असून राज्यभरात ४ कोटी ६९ लाख ९६ हजार २७९ महिला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. तर दिव्यांग मतदारांची संख्या ६ लाख ४१ हजार ४२५ इतकी आहे. राज्यातले ४२६ मतदान केंद्र ही महिलांकडून संचलित केली जाणार आहेत. नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे ४५ केंद्र महिलांकडून संचलित केली जाणार आहेत. **बीड, परभणी, वर्धा, जळगाव, गोंदिया, सोलापूर, मुंबई** उपनगर या जिल्ह्यांमध्येही महिलांकडून संचलित केली जाणारी केंद्र आहेत. शहरी भागात मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी गृहनिर्माण संकुलामध्ये तसंच झोपडपट्टी भागात मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.

**<><><><><>**

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ६३ टक्क्यांपेक्षा जास्त आणि गेल्या विधानसभा निवडणुकीत राज्यात ६१ पूर्णांक १ दशांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत ६१ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतदानाचा हक्क बजावण्यात महिलांपेक्षा पुरुष आघाडीवर असल्याचा सर्वसाधारण कल आहे.

यंदा मतदानाचं प्रमाण वाढावं यासाठी निवडणूक आयोग, स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संस्था यांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. सर्वत्र मतदान केंद्रांची माहिती देणाऱ्या मतदान चिठ्ठ्या निवडणूक आयोगानं घरोघरी पोहोचवल्या आहेत. मुंबईत एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात मतदान केंद्र असल्यानं विविध रंगांनी ही केंद्र सजवली आहेत आणि मतदान चिठ्ठ्यांवरही त्या रंगांचे स्टिकर लावले आहे. त्यामुळं मतदारांना त्यांचं मतदान केंद्र शोधणं सोपं होईल. मतदान केंद्रावर कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी रेल्वे विशेष लोकल चालवणार असल्याची माहिती मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्निल नीला यांनी दिली. मेट्रोनंही अतिरिक्त वेळेत सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मुंबईत दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक मतदारांना त्यांच्या घराजवळून मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी मोफत वाहन व्यवस्थाही उपलब्ध  सोयही आहे.

**<><><><><>**

आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांनी मतदारांना केलेलं आवाहन आता ऐकूया…

**होल्ड बाईट भवाळकर**

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात नालासोपाऱ्यामध्ये भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्या विरुद्ध आचारसंहिता भंगाची तक्रार दाखल झाली आहे. प्रचार संपल्यानंतर मतदारसंघाच्या बाहेरील राजकीय व्यक्तीला तिथे थांबता येत नाही. या नियमाचं उल्लंघन केल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल झाला आहे. तावडे पैसे वाटत असल्याचा व्हिडीओ बहुजन विकास आघाडी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रसिद्ध केला होता. हॉटेलची तपासणी केल्यानंतर निवडणूक यंत्रणेला ९ लाख ९३ हजार ५०० रुपये आणि काही कागदपत्रं सापडली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी दिली आहे.

बविआ कार्यकर्त्यांना गैरसमज झाला आहे. तरीही कुणाचा काही आक्षेप असेल तर निवडणूक आयोगाकडून चौकशी व्हावी, असा आपलाही आग्रही आहे, अशी प्रतिक्रिया तावडे यांनी दिली आहे.

विनोद तावडे हे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बैठक घेत असताना विरोधकांनी पूर्वनियोजित षडयंत्र करून आरोप केले आणि तावडे यांना गोवण्यात आलं. विरोधकांच्या पायाखालची जमीन सरकल्यामुळे हा बदनामीचा कट रचल्याची प्रतिक्रिया भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

याप्रकरणी तावडे यांच्या अटकेची मागणी काँग्रेसनं केली आहे. तावडे यांच्याकडे सापडलेली रक्कम नेमकी कुणाच्या तिजोरीतून आली आहे? जनतेचा पैसे लुटून तुमच्याकडे कुणी पाठवला, असा प्रश्न काँग्रेसचे ज्येष्ठ नेते राहुल गांधी यांनी समाज माध्यमावर केला आहे.

आतापर्यंत भाजपाने कशा पद्धतीने सरकारं पाडली त्याचा हा पुरावा आहे, अशी टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

नोटबंदी झाल्यानंतरही एवढ्या मोठ्या प्रमाणात रोख रक्कम भाजपाच्या लोकांकडेच कशी येते असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी केला.

पार्टी विथ डिफरन्स अशा बढाया मारणाऱ्या पक्षाचा इतका मोठा नेता पैसे वाटतो, हे अत्यंत धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया बविआ नेते हितेंद्र ठाकूर यांनी दिली आहे.

दरम्यान, डहाणू विधानसभा मतदारसंघात बहुजन विकास आघाडीकडून उमेदवारी मिळालेल्या सुरेश पाडवी यांनी मतदानाच्या आदल्या दिवशी भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

महिलांच्या आशियाई चषक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघानं आज प्रवेश केला. उपांत्य फेरीत भारतानं जपानवर २-० अशी मात केली. अंतिम फेरीत भारताची गाठ चीनशी पडेल. उपांत्य फेरीत चीननं मलेशियाला ३-१ असं नमवलं. स्पर्धेचा अंतिम सामना उद्या संध्याकाळी बिहारमध्ये राजगीर हॉकी मैदानावर पावणेपाच वाजता सुरू होईल.

**<><><><><>**

**श्रोते हो,**

राज्यभरातल्या मतदानाचा आढावा घेण्यासाठी उद्या संध्याकाळी ७ चे बातमीपत्र १५ मिनिटांचे प्रसारित केले जाईल. त्यानंतर सव्वा ७ ते सव्वा ८ या दरम्यान मागोवा मतदानाचा या विशेष कार्यक्रमात राज्यभरातल्या मतदानाची वैशिष्ट्य आपण जाणून घेणार आहोत. त्यानंतर सव्वा ८ ते साडे ८ दरम्यान राष्ट्रीय बातमीपत्र प्रसारित होईल.

**<><><><><>**

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला उद्यापासून गोव्यात सुरुवात होत आहे.  या महोत्सवात ८१ देशांमधले एकूण १८० चित्रपट प्रदर्शित केले जातील.  जागतिक चित्रपटाच्या दुनियेतले आगळेवेगळे स्वर आणि नवोन्मेषशाली कथन अधोरेखित करणाऱ्या इफ्फी या महोत्सवाचं हे ९५ वं वर्ष आहे. हा महोत्सव 28 नोव्हेंबरपर्यंत चालणार आहे.

//<><><><><>//